www.sgbauonline.com

**AR–298**

# B.A. (Part—II) Examination

## (Optional Subject)

## MARATHI LITERATURE

## मराठी वाङ्मय (ऐच्छिक)

वेळ : तीन तास] [एकूण गुण : 100

1. पुढील गद्य-पद्य खंडांचे संदर्भासह अर्थसौंदर्य स्पष्ट करा :— 20

(अ) "हे इतुलें दीस तुम्हापासिं होतें : आता जेयाचें तेयापासि जात असे : तुम्ही राहा :"

किंवा

"स्त्रिया पुरुषाचा ऐसा वेधु नाही : पुरुषा पुरुषाचा काइसा वेधु पा :"

(आ) "जी जी : गोसावी जाणत असति कीं : मातें द्रव्य नाही : सर्वज्ञें म्हणीतलें : तू उभा ठाकलासीचि पुरे : सीधीतें एथौनिचि नेइजैल कीं : पुरुषु आपुलें करणीये म्हणौनि प्रवर्ते : तयासि द्रव्याचीं सनें मिळति :"

किंवा

"एथ जातिकुळ नाहीं : खुंटदावें नाहीं : तेणें म्हणीतलें : जी : जी: गोसावीचि जातकुळ : गोसावीचि खुंटदावें :"

(इ) 'दवाचिया नावाखाली। काही देतात जीव बळी।
बंद करावी प्रथा असली। भावना सुधारोनि लोकांची।।'

किंवा

'तैसेचि करावे चरसंडास। मळ दिसोचि न द्यावा कोणास।
आपुल्या मळाची आपणास। व्यवस्था लावणे सोयीचे।।'



www.sgbauonline.com

www.sgbauonline.com

(ई) 'सर्वांगीण असावी ग्रामरचना। मनोरंजनासहित पुरवाव्यात भावना।
जेणेकरुन ग्रामवासीयांना। आठव ना ये शहराचा।।'

किंवा

"झोपी गेला घरचा धनी। सूर्य चालला डोक्यावरोनि।
उन्ह पडले तरी निजूनि। कड फेरितो झोपेचा।।''

2. 'लीळाचरित्र : एकाक' मध्ये श्रीचक्रधरांबरोबरच तत्कालीन अनेकविध व्यक्तींचेही दर्शन घडते ते सोदाहरण विशद करा. 20

किंवा

'लीळाचरित्र : एकाक' या ग्रंथाच्या आधारे महानुभाव तत्वज्ञानावर प्रकाश टाका.

3. ग्रामीण आरोग्य बिघडण्याची कारणे सांगून त्यावरील तुकडोजी महाराजांनी सांगितलेले उपाय आपल्या शब्दांमध्ये लिहा. 20

किंवा

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी गोवंश सुधाराबाबत केलेला उपदेश सविस्तर लिहा.

4. साहित्याचे स्वरूप सांगून साहित्यातील 'संवेदनात्मकता' व 'सेंद्रियत्व' यावर प्रकाश टाका. 20

किंवा

साहित्य निर्मिती प्रक्रियेतील प्रतिभा, कल्पनाशक्ती, स्फूर्ती, चमत्कृतीशक्ती, अनुभवसमृद्धीचे स्थान विशद करा.

5. साहित्याच्या भाषेतील वक्रोक्तिव्यापार, अलंकार, प्रतिमा, प्रतीके यांचे स्थान विशद करा. 20

किंवा

साहित्याची विविध प्रयोजने कोणती ? ते सविस्तर लिहा.



www.sgbauonline.com